Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

# दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। सोमवार, दि. २२ जून २०२६ । वर्ष १ ।अंक ७६ ।पाने २। Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION



भुसावळात महाराणा प्रताप जयंती उत्साहात साजरी

(पान २ वर)

## खा. ओमराजे निंबाळकरांचा शिंदे गटात प्रवेश; "नीच प्रवृत्तीच्या लोकांविरोधातील संघर्ष थांबणार नाही

# शिवसेनेचे ऑपरेशन टायगर फत्ते!

### ठाकरे कुटुंबाबद्दल आदर कायम, तर राणा जगजीतसिंह पाटलांविरोधातील भूमिका कायम

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई : धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी अखेर आपल्या राजकीय भूमिकेवर शिक्कामोर्तब करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीतील शिवसेना पक्षात प्रवेश करण्याची घोषणा केली.**

गोवर्धनवाडी येथे जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या दीर्घ बैठकीनंतर त्यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला. चार तासांहून अधिक काळ चाललेल्या बैठकीत कार्यकर्त्यांची मते जाणून घेतल्यानंतर ओमराजे यांनी सांगितले की, "धाराशिव लोकसभा मतदारसंघातील नागरिक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी सविस्तर चर्चा केली. त्यांच्या भावना आणि अपेक्षा लक्षात घेऊन मी एकनाथ शिंदे साहेबांच्या नेतृत्वात काम करण्याचा निर्णय घेतला आहे." यावेळी त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील अपयशावरही भाष्य केले. "सामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने काम केले, तरी



सत्तेच्या प्रभावामुळे अनेक ठिकाणी पराभव स्वीकारावा लागला. विकासकामांसाठी सत्तेची ताकद आवश्यक असते, हे वास्तव आम्हाला अनुभवावे लागले," असे ते म्हणाले. राजकीय निर्णय जाहीर करताना ओमराजे यांनी शिवसेना पक्षप्रमुख बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. "मला ठाकरे कुटुंबाचा कायम स्नेह लाभला. त्यांच्याबद्दल माझ्या मनात आजही आदर आहे. भविष्यात कोणतीही राजकीय परिस्थिती निर्माण झाली तरी माझ्याकडून त्यांच्याविरोधात एक शब्दही जाणार नाही," असे त्यांनी स्पष्ट केले. पवनराजे निंबाळकर हत्याकांडाच्या निकालानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरध्वनीवरून संपर्क साधल्याची माहितीही त्यांनी दिली. "निकालामुळे आम्हाला मोठे दुःख झाले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील अपयशावरही भाष्य केले. "सामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने काम केले, तरी सत्तेच्या प्रभावामुळे अनेक ठिकाणी पराभव स्वीकारावा लागला. विकासकामांसाठी सत्तेची ताकद आवश्यक असते, हे वास्तव आम्हाला अनुभवावे लागले," असे ते म्हणाले. राजकीय निर्णय जाहीर करताना ओमराजे यांनी शिवसेना पक्षप्रमुख बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. मात्र न्यायासाठी उच्च न्यायालयात जाण्याबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेतली," असे ओमराजे म्हणाले. महायुतीत प्रवेश करत असलो तरी काही व्यक्तींविरोधातील राजकीय संघर्ष कायम राहणार असल्याचे स्पष्ट करत त्यांनी नाव न घेता आमदार राणा जगजीतसिंह पाटील यांच्यावर निशाणा साधला.

#### 'सत्तेचा उपयोग सर्वसामान्यांसाठी करणार'

"मी पद किंवा पैशांसाठी हा निर्णय घेतलेला नाही. माझी ताकद सामान्य माणूस आहे. सत्तेचा उपयोग जनतेच्या विकासासाठी आणि त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी करणार आहे. माझ्या निर्णयाचे उत्तर मी भाषणातून नव्हे तर कामातून देईन," असे आश्वासनही ओमराजे निंबाळकर यांनी दिले. या घोषणेमुळे धाराशिवच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांवर त्याचे परिणाम दिसून येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

Selected

### भरउन्हात शेतात काम करताना शेतकऱ्याचा उष्माघाताने मृत्यू

पारोळा | प्रतिनिधी : तालुक्यातील शिरसोदे येथे भर दुपारी शेतात काम करत असताना उष्माघाताचा फटका बसून एका शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. २१) घडली. प्रतापराव दत्तू पाटील (वय ४९) असे मृत शेतकऱ्याचे नाव असून या घटनेमुळे गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. ग्रामस्थांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रतापराव पाटील हे रविवारी दुपारी १२ ते १ वाजेच्या सुमारास शेतात काम करत होते. यावेळी प्रचंड उष्णता आणि कडक उन्हाचा त्यांना तीव्र फटका बसला. त्यांना तातडीने मदत करण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांसह ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. वैद्यकीय तपासणीनंतर प्राप्त झालेल्या अहवालात प्रतापराव पाटील यांचा मृत्यू उष्माघातामुळे (सनस्ट्रोक) झाल्याचे स्पष्ट करण्यात आले .

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

### सोनबर्डी येथे जागतिक योग दिन उत्साहात साजरा

#### तालुका विधी सेवा समिती, एरंडोलचा उपक्रम



**जन सम्राट टाईम्स**

**सोनबर्डी | प्रतिनिधी:** तालुका विधी सेवा समिती, एरंडोल यांच्या वतीने शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, सोनबर्डी येथे जागतिक योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या उपक्रमासाठी एरंडोल न्यायालयाचे पॅरालीगल व्हॉलंटिअर (PLV) पंढरीनाथ मोरे यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत विविध योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर केले. योगामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ राहते, एकाग्रता वाढते तसेच सकारात्मक जीवनशैली विकसित होते, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापकांनी योगाचे मानवी जीवनातील महत्त्व विशद करत नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन केले. तसेच केंद्रप्रमुख एल. एम. पाटील यांनी विद्यार्थ्यांना योगाचे आरोग्यदायी फायदे समजावून सांगत निरोगी जीवनासाठी योगाची आवश्यकता अधोरेखित केली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली असून, नियमित योगाभ्यासाचा संकल्पही करण्यात आला.

#### ठळक बाबी

- तालुका विधी सेवा समिती, एरंडोलचा पुढाकार
- शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, सोनबर्डी येथे आयोजन
- पंढरीनाथ मोरे (PLV) यांचे सहकार्य
- विद्यार्थी व शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग
- योगाचे महत्त्व व आरोग्यदायी फायदे याविषयी मार्गदर्शन



### वैभव सूर्यवंशीचा श्रीलंकेत धडाका; ११ चेंडूत अर्धशतक

#### लिस्ट-ए क्रिकेटमध्ये सर्वात वेगवान अर्धशतकाचा विश्वविक्रम

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** : भारत 'अ' संघाचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीने श्रीलंकेत सुरू असलेल्या तिरंगी मालिकेच्या अंतिम सामन्यात धडाकेबाज फलंदाजी करत क्रिकेटविश्वाचे लक्ष वेधून घेतले. श्रीलंका 'अ'विरुद्धच्या निर्णायक सामन्यात वैभवने अवघ्या २९ चेंडूत ९४ धावांची विस्फोटक खेळी साकारत लिस्ट-ए क्रिकेटमधील सर्वात वेगवान अर्धशतकाचा नवा विश्वविक्रम आपल्या नावावर केला. वनडे स्वरूपातील सामन्यांमध्ये अपेक्षित कामगिरी न झाल्याने काही दिवसांपासून वैभववर टीका होत होती. मात्र, अंतिम सामन्यात त्याने आपल्या बॅटमधूनच सर्व टीकाकारांना चोख प्रत्युत्तर दिले. मैदानात उतरल्यापासूनच आक्रमक पवित्रा घेत त्याने श्रीलंकेच्या गोलंदाजांची अक्षरशः धुलाई केली. वैभवने केवळ ११ चेंडूंमध्ये अर्धशतक पूर्ण करत लिस्ट-ए क्रिकेटमधील सर्वात जलद अर्धशतकाचा विक्रम प्रस्थापित केला. यापूर्वी हा विक्रम श्रीलंकेच्या खेळाडू लसिथ क्रुस्पूल्ली वीररत्ने यांच्या नावावर होता. त्यांनी १२ चेंडूत अर्धशतक झळकावले होते. वैभवने हा विक्रम मोडत नवा इतिहास रचला. अवघ्या २९ चेंडूंमध्ये ९४ धावा करताना वैभवने १० चौकार आणि ८ षटकारांची आतषबाजी केली. त्याचा स्ट्राइक रेट तब्बल ३२४.१३ इतका होता. शतकाच्या अगदी जवळ पोहोचलेला वैभव मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात बाद झाला आणि अवघ्या ६ धावांनी त्याचे शतक हुकले. मात्र त्याने केलेल्या आक्रमक फलंदाजीने सामन्याचे चित्रच बदलून टाकले. सामन्यात श्रीलंका 'अ'चा कर्णधार सहन अराचचिंगे याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. मात्र वैभवच्या तुफानी खेळीमुळे हा निर्णय चुकल्याचे स्पष्ट झाले. भारताने अवघ्या ६.३ षटकांत १०० धावांचा टप्पा पार केला. वैभवने केवळ ११ चेंडूंमध्ये अर्धशतक पूर्ण करत लिस्ट-ए क्रिकेटमधील सर्वात जलद अर्धशतकाचा विक्रम प्रस्थापित केला. यापूर्वी हा विक्रम श्रीलंकेच्या खेळाडू लसिथ क्रुस्पूल्ली वीररत्ने यांच्या नावावर होता. त्यांनी १२ चेंडूत अर्धशतक झळकावले होते. वैभवने हा विक्रम मोडत नवा इतिहास रचला. वैभव मैदानात असताना भारतीय संघाचा संभाव्य स्कोअर ९०० धावांच्या घरात दाखवला जात होता, इतकी त्याची फलंदाजी आक्रमक होती.

#### टीका, वाद आणि दमदार पुनरागमन

मागील सामन्यातील सुपर ओव्हरनंतर निर्माण झालेल्या वादामुळे वैभव चर्चेत होता. तसेच या स्पर्धेत त्याला अपेक्षित मोठी खेळी करता आली नव्हती. मात्र अंतिम सामन्यात त्याने केलेल्या तुफानी फलंदाजीमुळे त्याच्या प्रतिभेवर शिक्कामोर्तब झाले आहे. युवा वयातच विक्रमांची मालिका रचणाऱ्या वैभवने भविष्यात भारतीय क्रिकेटचा मोठा आधारस्तंभ ठरण्याचे संकेत दिले आहेत.

### सर्वज्ञ माध्यमिक विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

#### योग आणि प्राणायामाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले; निरोगी जीवनाचा दिला संदेश

**जन सम्राट टाईम्स**

**बोरगाव, ता. धरणगाव| प्रतिनिधी** : स्पर्श फाऊंडेशन, जळगाव संचलित सर्वज्ञ माध्यमिक विद्यालय, बोरगाव येथे २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये योगाबाबत जागरूकता निर्माण करणे आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश पोहोचविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. यावेळी विद्यालयाचे योगशिक्षक एस. डी. पाटील यांनी



विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना योगाचे महत्त्व सविस्तरपणे समजावून सांगितले. नियमित योगाभ्यास आणि प्राणायामामुळे शारीरिक तसेच मानसिक आरोग्य सुदृढ राहते, एकाग्रता वाढते आणि दीर्घायुष्य लाभण्यास मदत होते, असे त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध योगासने आणि प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर केले. योगामुळे तणावमुक्त जीवन जगता येते तसेच सकारात्मक विचारसरणी विकसित होते, याबाबतही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. एच. महानुभाव यांच्यासह शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन क्रीडा शिक्षक ए. एम. जयकारे तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आरोग्य, शिस्त आणि निरोगी जीवनाचे महत्त्व पटवून देण्यात आले. "योग करा, निरोगी रहा" हा संदेश देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन ठरणार वादळी!



**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी** : राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सोमवारपासून सुरू होत असताना त्याच्या पूर्वसंध्येला महाविकास आघाडीने महायुती सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. राज्य सरकारच्या अपयशी कारभाराचा निषेध करत तसेच जनतेच्या प्रश्नांबाबत सरकार असंवेदनशील असल्याचा आरोप करत महाविकास आघाडीने सरकारच्या पारंपरिक चहापान कार्यक्रमावर बहिष्कार टाकला.

महाविकास आघाडीच्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत शिवसेना (ठाकरे गट), काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या नेत्यांनी राज्यातील विविध प्रश्नांवर सरकारवर जोरदार टीका केली. शेतकरी, दुष्काळ, महिला सुरक्षा, कायदा-सुव्यवस्था, बेरोजगारी आणि वाढते अमली पदार्थांचे जाळे यांसारख्या गंभीर विषयांवर सरकार अपयशी ठरल्याचा आरोप त्यांनी केला. शिवसेना (ठाकरे गट)चे गटनेते भास्कर जाधव यांनी राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर भाष्य करत, अनेक भागांत पेरण्या लांबल्याने शेतकरी संकटात सापडल्याचे सांगितले. त्यामुळे राज्य सरकारने तातडीने सुका दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी त्यांनी केली. तसेच सरकारने जाहीर केलेली शेतकरी कर्जमाफी ही फसवी असून त्यात अनेक अटी-शर्तींचा अडथळा असल्याचा आरोप करत शेतकऱ्यांचा सातबारा पूर्णपणे कोरा करावा, अशी मागणीही त्यांनी केली. काँग्रेसचे विधान परिषद गटनेते सतेज पाटील यांनी राज्य सरकारवर गंभीर आरोप करत हे "५६ टक्के कमिशन सरकार" असल्याची टीका केली. विविध विकासकामांच्या कंत्राटदारांना बिले मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कमिशन द्यावे लागत असल्याचा आरोप त्यांनी केला. राज्यातील कंत्राटदारांची तब्बल एक लाख कोटी रुपयांहून अधिक रकमेची बिले प्रलंबित असल्याचेही त्यांनी सांगितले. याशिवाय जलजीवन मिशनच्या निधीत कपात झाल्यामुळे ग्रामीण भागातील अनेक महत्त्वाच्या योजना रखडल्याचा आरोपही करण्यात आला. राज्यावरील कर्जाचा बोजा सुमारे साडेनऊ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याने महाराष्ट्राची आर्थिक स्थिती चिंताजनक बनल्याचेही विरोधकांनी नमूद केले. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आगामी अधिवेशनात शेतकरी प्रश्न, दुष्काळ, महिला अत्याचार, कायदा-सुव्यवस्था, बेरोजगारी आणि आर्थिक संकट यांसारख्या मुद्द्यांवर सरकारला कोंडीत पकडण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे तीन आठवडे चालणारे पावसाळी अधिवेशन चांगलेच गाजण्याची चिन्हे दिसत आहेत.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

### राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने प्रा. विकी घायतडक सन्मानित

#### शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाची राज्यस्तरावर दखल; जामखेडच्या शैक्षणिक विश्वात आनंदाचे वातावरण

**जन सम्राट टाईम्स**

**जामखेड | प्रतिनिधी** : शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी राबविलेल्या विविध उपक्रमांची दखल घेत जामखेड येथील दि. पिपल्स एज्युकेशन सोसायटी संचलित डिप्लोमा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा. विकी धर्मेंद्र घायतडक यांना 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार – २०२६' प्रदान करण्यात आला आहे. ग्लोबल एलीट मीडिया अँड टेक यांच्या वतीने सिम्बॉयसिस इंटरनॅशनल, पुणे येथे आयोजित विशेष समारंभात हा प्रतिष्ठेचा पुरस्कार




प्रदान करण्यात आला. यावेळी प्रवीण नितीनवरे (डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज), मनोज हंबर्डे (एमआयटी), प्रेमेंद्र बनसोड (जी. एच. रायसोनी, वाघोली), बाबासाहेब दिघे (रेड चिली मीडिया), अजय बोरकर (वाडिया इन्स्टिट्यूट, पुणे), तपोपत (डी. वाय. पाटील) तसेच अशोक महाराज पवार यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. प्रा. घायतडक यांनी शिक्षण क्षेत्रात नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावृद्धीसाठी सातत्याने कार्य केले आहे. संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीत त्यांनी महत्त्वपूर्ण नेतृत्व केले असून अनेक विद्यार्थ्यांच्या करिअर घडविण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. या सन्मानामुळे जामखेड तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि सार्वजनिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. प्रा. घायतडक यांना यापूर्वीही विविध प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. शिक्षण, समाजसेवा आणि नेतृत्व क्षेत्रातील त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते. राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार हा त्यांच्या कार्याचा आणखी एक मानाचा तुरा ठरला आहे.

#### विद्यार्थ्यांच्या करिअर घडविण्यात मोलाचा वाटा

ग्लोबल एलीट मीडिया अँड टेक यांच्या वतीने सिम्बॉयसिस इंटरनॅशनल, पुणे येथे आयोजित विशेष समारंभात हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी प्रवीण नितीनवरे (डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज), मनोज हंबर्डे (एमआयटी), प्रेमेंद्र बनसोड (जी. एच. रायसोनी, वाघोली), बाबासाहेब दिघे (रेड चिली मीडिया), अजय बोरकर (वाडिया इन्स्टिट्यूट, पुणे), तपोपत (डी. वाय. पाटील) तसेच अशोक महाराज पवार यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. प्रा. घायतडक यांनी शिक्षण क्षेत्रात नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावृद्धीसाठी सातत्याने कार्य केले आहे. संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीत त्यांनी महत्त्वपूर्ण नेतृत्व केले असून अनेक विद्यार्थ्यांच्या करिअर घडविण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे.

# चांगल्या विचारांची पेरणी करणारा शिक्षकच खरा देशाचा शिल्पकार!

## ज्ञानसंवाद कार्यक्रमात ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. प्रकाश पाठक यांचे प्रतिपादन

जन सम्राट टाईम्स

**भालोद, ता. भुसावळ प्रतिनिधी:** शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम आहे. समाजजीवनात सकारात्मक विचारांची पेरणी करणारा शिक्षकच खऱ्या अर्थाने देशाचा शिल्पकार असतो. त्यामुळे शिक्षकांचा सन्मान आणि आदर जपणे ही समाज व शासनकर्त्यांची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व विचारवंत प्रा. प्रकाश पाठक यांनी केले. कृषीमित्र स्वर्गीय हरीभाऊ जावळे मित्रपरिवाराच्या वतीने आयोजित 'ज्ञानसंवाद' कार्यक्रमात कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद येथे ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेकंडरी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष गणेशदादा नेहेते होते. यावेळी रावेर-यावल मतदारसंघाचे आमदार अमोलदादा जावळे, चेअरमन हेमलताताई इंगळे, संस्थेचे सचिव भास्करदादा पिंपळे, ज्येष्ठ संचालक अरुणदादा चौधरी यांच्यासह परिसरातील १४ माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयांतील शिक्षक प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा. पाठक यांनी आपल्या मार्गदर्शनात शिक्षणव्यवस्थेतील बदलत्या आव्हानांवर भाष्य करताना सांगितले की, शिक्षणाचा अर्थ आपण केवळ गुणांपुरता मर्यादित ठेवल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मन आणि मनगटाचा विकास अपेक्षित प्रमाणात झाला नाही. शिक्षणाने केवळ बुद्धिमत्ता



नव्हे, तर संवेदनशीलता, मूल्ये आणि कृतीशीलता देखील विकसित झाली पाहिजे. विद्यार्थ्यांना फक्त परीक्षार्थी न बनवता आदर्श नागरिक घडविणे ही शिक्षण व्यवस्थेची खरी जबाबदारी आहे. "विद्यार्थ्यांचे बौद्धिक, वैचारिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि कलात्मक पैलू विकसित होण्यासाठी शिक्षकांनी अधिक व्यासंगी, अभ्यासू आणि विवेकी होणे आवश्यक आहे. विद्यार्थी शिक्षकांचे अनुकरण करतात. त्यामुळे शिक्षकांनी स्वतःचे व्यक्तिमत्त्व आदर्शवत घडविले पाहिजे. शिक्षक हे केवळ रोजगाराचे पद नसून सेवा आणि समर्पणाचे दायित्व आहे," असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट करताना आमदार अमोलदादा जावळे यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासोबतच त्यांच्या नेतृत्वगुणांचा विकास व्हावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना विविध कौशल्याधारित विषय शिकण्याची संधी उपलब्ध होणार असून, समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी नेतृत्वक्षम, सक्षम आणि मूल्याधिष्ठित पिढी घडविणे आवश्यक आहे.

### कर्मचारी हेच कोणत्याही संस्थेचे खरे बळ

चेअरमन हेमलताताई इंगळे यांनी संस्थेच्या शताब्दीपूर्तीच्या गौरवशाली वाटचालीचा आढावा घेत शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी हेच कोणत्याही संस्थेचे खरे बळ असल्याचे सांगितले. "सेवाभावी शिक्षक आणि कर्मचारी हीच आमच्या संस्थेची खरी श्रीमंती आहे. शिक्षकांनी मनापासून ठरवले तर समाजातील अनेक अवगुण कमी होऊ शकतात. शिक्षक या व्यक्तिमत्त्वावर माझा दृढ विश्वास आहे," असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. सुनील नेवे यांनी केले.

# न्यू इंग्लिश स्कूल, नशिराबाद येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

## प्रख्यात योग शिक्षिका कोल्हे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स



**नशिराबाद । प्रतिनिधी** : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त न्यू इंग्लिश स्कूल, नशिराबाद येथे विशेष योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी जळगाव येथील प्रख्यात योग शिक्षिका सौ. दिपाली कोल्हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणेचा अनुभव घेतला. कार्यक्रमाच्या प्रारंभी सौ. दिपाली कोल्हे यांनी योग, प्राणायाम, ध्यानधारणा, कपालभाती आणि अनुलोम-विलोम यांचे मानवी जीवनातील महत्त्व सविस्तरपणे स्पष्ट केले. योग हा केवळ शारीरिक व्यायाम नसून मानसिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासाचे प्रभावी माध्यम असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी विविध योगासनांची प्रात्यक्षिके सादर करून विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष सराव करून घेतला.

विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवत त्यांनी मनाची आणि मेंदूची एकाग्रता वाढविणे, अभ्यासात लक्ष केंद्रित करणे तसेच सकारात्मक विचारसरणी विकसित करण्यासाठी योगाची भूमिका अधोरेखित केली. आजच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीत योग हा निरोगी आरोग्याचा आधारस्तंभ ठरू शकतो. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक शांतता आणि आत्मविश्वास वाढतो, असेही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना योगाचे वैज्ञानिक महत्त्व आणि आरोग्यदायी जीवनासाठी त्याची आवश्यकता समजली. शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला. कार्यक्रमाच्या शेवटी न्यू इंग्लिश स्कूल परिवाराच्या वतीने सौ. दिपाली कोल्हे यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. उपस्थितांनी नियमित योगाभ्यास करून निरोगी व सकारात्मक जीवन जगण्याचा संकल्प केला.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

# १९९०-९१ बॅचतर्फे आंतरराष्ट्रीय योग दिन

## प्राणायामातून दिला निरोगी जीवनशैलीचा संदेश



जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद । प्रतिनिधी ।** आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधत न्यु इंग्लिश स्कूल, नशिराबाद येथील दहावीच्या १९९०-९१ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी रविवारी सकाळी एकत्र येत योगासन कार्यक्रमाचे आयोजन केले. श्री स्वामी समर्थ केंद्र येथे पार पडलेल्या या उपक्रमाला माजी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रविवार, २१ जून २०२६ रोजी सकाळी ६ ते ७ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात १९९०-९१ बॅचचे माजी विद्यार्थी विशेष छापील टी-शर्ट परिधान करून सहभागी झाले होते. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणा करत आरोग्यदायी जीवनाचा संदेश दिला. निसर्गरम्य वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमात सहभागी सदस्यांनी सूर्यनमस्कारासह विविध योगासनांचे सादरीकरण केले. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ राहते, तणाव कमी होतो तसेच सकारात्मक विचारसरणी विकसित होते, असा संदेश यावेळी देण्यात आला. योग हा भारतीय संस्कृतीचा अमूल्य वारसा असून निरोगी जीवनासाठी प्रत्येकाने दैनंदिन जीवनात योगाचा अंगीकार करावा, असे मत उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. समाजात आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी तसेच भावी पिढीपर्यंत योगाचे महत्त्व पोहोचवण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे परिसरात आरोग्य आणि योगाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, माजी विद्यार्थ्यांच्या सामाजिक बांधिलकीचेही दर्शन घडले. नशिराबाद परिसरात या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

### कार्यक्रमाची वैशिष्ट्ये

- १९९०-९१ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग
- श्री स्वामी समर्थ केंद्र येथे योगासन व प्राणायाम सत्र
- विशेष छापील टी-शर्टमुळे आकर्षण
- निरोगी जीवनशैलीचा संदेश
- समाजात योगाबाबत जनजागृतीचा प्रयत्न

# लाडकुबाई प्राथमिक विद्यामंदिरात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

जन सम्राट टाईम्स

**भडगाव | प्रतिनिधी:** कर्मवीर तात्यासाहेब हरी रावजी पाटील किसान शिक्षण संस्था संचलित लाडकुबाई प्राथमिक विद्यामंदिर, भडगाव येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये योगाबाबत जागरूकता निर्माण व्हावी तसेच निरोगी जीवनशैलीचा संदेश पोहोचावा या उद्देशाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक योगासनांनी झाली. यावेळी योग मार्गदर्शक ज्ञानेश्वर गांगुर्डे यांनी विविध योगासनांचे प्रात्यक्षिक सादर करत प्रत्येक आसनाचे आरोग्यदायी महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध योगासने सादर केली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी योगाचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ राहते, एकाग्रता वाढते तसेच दैनंदिन जीवनात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. योग हा निरोगी आणि संतुलित जीवनाचा आधार असल्याने प्रत्येकाने नियमित योगाभ्यास करावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी योगाचे महत्त्व जाणून घेत नियमित योगाभ्यास करण्याचा संकल्प केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य, शिस्त आणि सकारात्मक विचारांची जाणीव निर्माण झाली. कार्यक्रमास शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संगीता शेलार, सुनीता देवरे, अनिता सैंदाणे, अनंत हिरे, ज्ञानेश्वर गांगुर्डे, हर्षल पाटील, किरण पाटील, सुयोग पाटील, सचिन पाटील तसेच शिक्षकेतर कर्मचारी चंद्रकांत पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.शाळेचे मुख्याध्यापक कमलेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# के.जी. गुजराथी मूकबधिर निवासी विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

## विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग; योगाचे महत्त्व पटवून दिले

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी:** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आज, रविवार दि. २१ जून २०२६ रोजी धरणगाव येथील के.जी. गुजराथी मूकबधिर निवासी विद्यालयात विशेष योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे मुख्याध्यापक वाल्मीक पाटील यांनी योगाचे शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व विशद केले. नियमित योगाभ्यासामुळे एकाग्रता वाढते, तणाव कमी होतो आणि शरीर निरोगी राहण्यास मदत



होते, असे त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले. यानंतर शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणेचे प्रात्यक्षिक सादर केले. विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने योगासनांमध्ये सहभाग नोंदवत उपस्थितांची मने जिंकली.योग दिनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याबरोबरच नियमित योगाभ्यासाची सवय लागावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे विद्यालय प्रशासनाने सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### निरोगी जीवनाचा संदेश

शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणेचे प्रात्यक्षिक सादर केले. विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने योगासनांमध्ये सहभाग नोंदवत उपस्थितांची मने जिंकली.योग दिनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याबरोबरच नियमित योगाभ्यासाची सवय लागावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे विद्यालय प्रशासनाने सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# योगासनांच्या जयघोषात ग्लोबस स्कूल दुमदुमले

## योग दिन उत्साहात साजरा; विद्यार्थ्यांनी सादर केली विविध योगासने

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद । प्रतिनिधी :** योग हा केवळ व्यायाम नसून ती एक निरोगी आणि संतुलित जीवनशैली आहे,' हा संदेश देत नशिराबाद येथील ग्लोबस इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. शाळेच्या प्रांगणात आयोजित विशेष योग सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध योगासने आणि सूर्यनमस्कारांचे प्रभावी सादरीकरण केले. कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक योगाभ्यासाने झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी



टाळी योग, सूर्यनमस्कार तसेच विविध प्रकारची योगासने अत्यंत शिस्तबद्ध आणि आत्मविश्वासपूर्ण पद्धतीने सादर केली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणामुळे संपूर्ण परिसर योगमय झाला होता. कार्यक्रमादरम्यान शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योगाचे मानवी जीवनातील महत्त्व समजावून सांगितले. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक क्षमता वाढते, शरीर सुदृढ राहते, मानसिक एकाग्रता सुधारते आणि आत्मविश्वास वृद्धिंगत होतो, असे मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सकारात्मक जीवनशैली घडविण्यासाठी योगाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. यावेळी शिक्षकांनी विविध योगासनांची प्रात्यक्षिके सादर करून त्यामागील वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आरोग्यविषयक फायदे सोप्या भाषेत स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनीही उत्साहाने सहभाग घेत सूर्यनमस्कार आणि विविध आसनांचे प्रात्यक्षिक सादर केले. याप्रसंगी बोलताना शिक्षकांनी सांगितले की, "योग ही भारताने जगाला दिलेली अनमोल देणगी आहे. आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात निरोगी शरीर, शांत मन आणि सकारात्मक विचारांसाठी योग हा प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला पाहिजे." या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य, फिटनेस आणि मानसिक स्वास्थ्याबाबत जागरूकता निर्माण झाली असून नियमित योगाभ्यासाची प्रेरणा मिळाली आहे. उपक्रमाचे पालक आणि परिसरातील नागरिकांकडूनही कौतुक करण्यात येत आहे.

# बोहरा सेंट्रल स्कूलमध्ये जागतिक योग दिन उत्साहात

## विद्यार्थ्यांनी सादर केली विविध योगासने



जन सम्राट टाईम्स

**पारोळा | प्रतिनिधी:** लोकमान्य टिळक शिक्षण संस्था संचालित तथा पारोळा शहरातील एकमेव सीबीएसई संलग्न बोहरा सेंट्रल स्कूल येथे जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात आणि विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमातून योगाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राधेश्याम चौधरी (भाजप जिल्हाध्यक्ष), रोहन मोरे (उपनगराध्यक्ष), अतुल पवार (भाजप मंडळ अध्यक्ष), कृतिका आफ्रे (भाजप महिला अध्यक्षा) आणि अनिल टोळकर (व्यापारी आघाडी जिल्हा उपाध्यक्ष) उपस्थित होते.पतंजली जिल्हा योग समितीचे प्रभारी मुकुंद बोहरा, योगशिक्षक प्रा. विकास सोनवणे, सोनजे, भगवान अमृतकर तसेच योगसाधक अतुल पवार, अनिल तांबट, विजय पाटील, संदीप कासार, दत्तात्रय महाजन, राजेंद्र अमृतकर, प्रकाश पाटील, सुनील भोई, प्रसाद भदान, नरेंद्र भदान, राजेंद्र चौधरी आणि कांतीलाल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योगासने आणि प्राणायामांचे प्रात्यक्षिक सादर केले. विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार, कपालभाती, अनुलोम-विलोम, चक्रासन, वज्रासन, शीर्षासन आणि हास्यासन यांसारख्या विविध योगप्रकारांचे सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली.यावेळी संस्थेचे चेअरमन सुरेंद्र बोहरा, प्राचार्या रीयंका अरझारे, व्हाईस प्रिन्सिपल स्मिनीला, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या मनोगतात डॉ. राधेश्याम चौधरी यांनी योगाचे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन केले. "योग हा केवळ व्यायाम नसून निरोगी, संतुलित आणि सकारात्मक जीवनशैलीचा पाया आहे," असे ते म्हणाले.

### निरोगी जीवनाचा संकल्प

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी नियमित योगाभ्यास करून निरोगी आणि तंदुरुस्त जीवन जगण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्या रीयंका अरझारे यांनी सर्व मान्यवर, योगसाधक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे आभार मानत जागतिक योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. "योग करा, निरोगी रहा" हा संदेश देत कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज | ज

# भुसावळात महाराणा प्रताप जयंती उत्साहात साजरी

## राष्ट्रीय राजपूत करणी सेनेच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रमांचे आयोजन; महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ । प्रतिनिधी:** शूरवीर, राष्ट्रनायक आणि स्वाभिमानाचे प्रतीक असलेल्या महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त भुसावळ शहरात भव्य आणि उत्साहपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय राजपूत करणी सेना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सोहळ्याचे नेतृत्व जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षा जयश्री पाटील आणि उपाध्यक्षा प्रतीक्षा पाटील यांनी केले. जयंतीनिमित्त शहरात विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. यावेळी राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे व त्यांच्या सौभाग्यवती रजनी सावकारे यांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन व आरती करण्यात आली. उपस्थित समाजबांधवांनी महाराणा प्रताप यांच्या शौर्य, त्याग आणि राष्ट्रनिष्ठ कार्याला अभिवादन केले. यंदाच्या जयंती सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे महिलांचा मोठ्या प्रमाणावरील सहभाग. समाजातील महिला वर्गाने विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग



घेत जयंती उत्सवाला वेगळीच शोभा आणली.कार्यक्रमादरम्यान मुलींनी सादर केलेल्या साहसी आणि चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची मने जिंकली.

या प्रात्यक्षिकांना नागरिकांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.या सोहळ्यास समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये शिवसेना जिल्हाध्यक्ष समाधान महाजन, सुरतसिंह पाटील, दिलीपसिंह पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विलास पाटील, चोरवड-खेडीचे सरपंच भैया महाजन, दीपक भोळे, वराडसीमचे उपसरपंच विजय पाटील, खडका येथील पोलीस पाटील दारासिंग पाटील, जितू पाटील, करणी सेनेचे प्रवीणसिंह पाटील, संजना राजपूत, संदीप ठाकूर, बापू राणा, शिवचरण निकम, शिवसेना तालुकाध्यक्षा वर्षा तल्लारे, संग्रामसिंह पाटील, बी.एन. पाटील, आनंदा राजपूत यांच्यासह असंख्य समाजबांधव उपस्थित होते.समाजसेवक राजू राजपूत यांच्या वतीने उपस्थित समाजबांधवांचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला. तसेच प्रसिद्ध उद्योजक प्रशांत राजपूत यांनी सर्व उपस्थितांसाठी थंड पेय आणि आइस्क्रीमचे वाटप करून जयंती उत्सवाचा आनंद द्विगुणित केला.

### आयोजकांनी समाजबांधवांचे आभार मानले

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दामोदर राजपूत, संदीप राणा, सारिका पाटील, जयश्री पाटील, प्रतीक्षा पाटील, मीना पाटील, कविता पाटील, वीरेंद्र पाटील आणि गणेश पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांनी उपस्थित समाजबांधवांचे आभार मानले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306